वर्ष : ०४ | अंक: ३२ | मुंबई, मंगळवार ३ जुलै २०१८ ते ९ जुलै २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक



PG 2 छगन भुजबळ हेच घोटाळ्याचे सूत्रधार!

3 → भूगर्भाची रचना लक्षात घ्या

'राज ठाकरेंचा मनसे पक्ष संपलाय' ← 4



एम्. के. घारे ज्वेलर्स

नातं सोन्यापलीकडचं......१९३३ पासून

८ मोहक अलंकारांचा सोनं, चांदी, हिरे, नवरत्ने खरेदीचा



THE LEGACY OF 84 YEARS

परळ | कांदिवली | गोरेगाव | विरार
भांडुप | बोरिवली | मिरारोड

www.mkgharejewellers.com


## मुंबई पोलिसांसाठी आनंदाची बातमी!

# ८ तास कर्तव्याचा कार्यालयीन आदेश जारी



**मुंबई- ३० जून रोजी मुंबई पोलीस आयुक्त पदी सुबोध जयस्वाल यांची नियुक्ती झाली आणि मुंबई पोलीस दलात एकच चर्चा सुरू झाली. दत्ता पडसलगीकर यांची महासंचालक पदी बढती... आयुक्त बदलले तसे '८ तास कर्तव्या'चे बदलून पूर्वीप्रमाणे परिस्थिती होईल, या चर्चेला काही दिवसांपासून उधान आले होते. मात्र प्रेमळ व्यक्तिमत्व असलेल्या मावळत्या आयुक्त दत्ता पडसलगीकर यांनी उत्तम कामगिरी करून '८ कर्तव्या'चा कार्यालयीन आदेश ३० जून २०१८ रोजी जारी करण्यात आला. त्यामुळे '८ तास कर्तव्या'चे मुंबई पोलीस दलासाठी यापुढेही कायम राहणार आहेत.**

मुंबई पोलीस दलात कर्तव्यावर असलेले पोलीस मोठ्या संख्येने मुंबईबाहेरून अर्थात ठाणे, पालघर, रायगड येथून कर्तव्यावर येतात. कामाला येण्याची वेळ निश्चित होती मात्र घरी केव्हा जाता येईल, हे सांगता येत नव्हते. सदर बाब पोलीस नाईक (बक्कल नं. ००४३३) (तत्कालीन पोलीस कॉस्टेबल) रवींद्र पाटील यांच्या लक्षात आली. पाटील यांनी यावर अभ्यास करून मुंबई पोलिसांनाही ८ तास कर्तव्याचे बजावता येऊ शकतात, याची संपूर्ण माहिती (७६ पानांची) २२फेब्रुवारी २०१६ रोजी तत्कालीन पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांच्या कार्यालयात सादर केली. उत्तम नियोजनामुळे कर्तव्याचे तास कमी होऊन मुख्यत: पोलिसांचे आरोग्य उत्तम राहूण त्यांनाही कुटुंबीयांसाठी वेळे देता येईल, यासारख्या एकना अनेक सुखद क्षण केवळ '८ तास कर्तव्या'मुळे शक्य होणार होते. पोलीस नाईक पाटील यांची संकल्पना तत्कालीन आयुक्त दत्ता पडसलगीकर यांनी ५ मे २०१६ रोजी मुंबईतील मोक्याचे 'देवनार' पोलीस ठाणे येथे प्रथमत: राबवली. अपेक्षा प्रमाणे '८ तास कर्तव्या'ची संकल्पना यशस्वी ठरली आणि आजच्या घडीला '८ तास कर्तव्या'ला २ वर्ष झाली असून, मुंबई पोलीस ३ सत्रांमध्ये ८ तास कर्तव्य बजावत आहेत. पोलीस आयुक्त दत्ता पडललगीकर यांची बढती झाल्यानंतर

उर्वरित पृष्ठ 2 वर

## कुणी-कुठे आणि कसं मरायचं, डायरीत नोंद, ११ जणांचा मृत्यू अंधश्रद्धेतून?

**नवी दिल्ली-** राजधानी दिल्लीतील बुराडी इथं एकाच कुटुंबातील ११ जणांचे मृतदेह लटकलेल्या अवस्थेत मिळाल्याने देशभरात एकच खळबळ उडाली आहे. १ जुलैला हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर आता त्याबाबतची नवनवी माहिती समोर येत आहे.या ११ जणांचा मृत्यू अंधश्रद्धेतून झाल्याची चर्चा आहे. त्याचं कारण म्हणजे घरातून एक रजिस्टर/नोंदवही मिळाली आहे. या नोंदवहीत कोणी कसं मरायचं आणि कोणाची मरणाची जागा कुठे असेल, याबाबतचा उल्लेख आहे. इतकंच नाही तर मृत्यूसाठी स्टूलचा वापर करु, डोळे बंद करु आणि हात बांधले तर आपल्याला मोक्ष मिळेल, असा उल्लेख या वहीत आहे.महत्त्वाचं म्हणजे नोंदवहीतील उल्लेखाप्रमाणेच सर्व ११ मृतदेह त्या अवस्थेतच होते.सध्या या सर्व मृतदेहांच्या




शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरु आहे. त्याबाबतच्या अहवाल आल्यानंतर मृत्यूचं खरं कारण करेल.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घरातील रजिस्टरमध्ये मोक्ष प्राप्तीचा मार्ग सांगण्यात आला आहे. 'जर तुम्ही स्टूल वापरुन, डोळे बंद करुन आणि हात बांधाला, तर मोक्ष मिळेल'असं या रजिस्टरमध्ये म्हटलं आहे.नोंदवहीतील उल्लेखाप्रमाणेच सर्व ११ मृतदेह स्टूल वापरुन, डोळे बंद करुन आणि हात बांधालेल्या अवस्थेत लटकलेले होते. त्यामुळे पोलिसांनी अंधश्रद्धेच्या अँगलने तपास सुरु केला आहे. सुरुवातील पोलिसांनी सामूहिक आत्महत्या असल्याची शक्यता वर्तवली होती.

## धुळे हत्याकांड : आतापर्यंत २३ जणांना अटक



**धुळे-** मुले पळवणारी टोळी समजून पाच जणांची हत्या केल्याप्रकरणी आतापर्यंत २३ जणांना अटक करण्यात आली आहे. साक्री तालुक्यातील राईनपाडा या आदिवासी पाड्यावर १ जुलैला, जमावाने मुले पळवणारी टोळी समजून पाच जणांची हत्या केली.राईनपाडा हे साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आदिवासी गाव आहे. या गावाच्या आठवडे बाजारात काहीजण फिरत होते. हे फिरणारे लोक मुले पळवणारी टोळी आहे, असा संशय घेऊन १ जुलैला दुपारी त्यांना ग्रामपंचायतीच्या कार्यालयात डांबून मारहाण करण्यात आली.मुलं पळवण्याच्या संशयातून पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राईनपाडा गावात नागरिकांनी ५ जणांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांना ग्रामपंचायतच्या खोलीत डांबण्यात आलं. तिथंही त्यांना बेदम मारहाण झाली. यावेळी संपूर्ण खोलीत रक्ताचा सडा पडलेला दिसला.

## सिनियर सिटीझन सोशल राईट्स तर्फे

# अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा शाळ श्रीफळ व भेटभस्तू देऊन सत्कार




**अंधेरी-** प्रतिमासीक घेण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक वाढदिवस कार्यक्रम यावेळी ही खूप मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांची उपस्थितीत पार पाडला. आश्रय ट्रस्ट संलग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स संस्थेच्यावतीने मागील चार वर्षांपासून साईवाडी अंधेरी येथे अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात कामगिरी बजावलेल्या

उर्वरित पृष्ठ 4 वर



## सौजन्य व्हॉट्सअप




## लॉटरी रोजगार बचाव महाकृती समितीचा संपूर्ण राज्यभर काळा दिवस साजरा

एक देश एक कार वाक्याचा विसर पडलेल्या केंद्र सरकारच्या निषेधार्थ संपूर्ण राज्यभर काळा दिवस साजरा करण्यात आला. गेले पन्नास वर्ष वेगवेगळ्या पद्धतीने राज्या सुरू असलेल्या लॉटरी व्यवसायाला सरकार ने २८ टक्के जीएसटी कर लावून देशोधडीला लावले. सरकारने २८ टक्के कर लावण्याऐवजी कमीतकमी १२




टक्के कर आकारावा अशी मागणी लॉटरी रोजगार बचाव महाकृती समितीने केली होती. परंतु यावर कोणतीही मागणी मान्य न करता लॉटरी व्यवसाय पूर्णपणे बंद करण्याचा अघोषित ठराव केला असेच दिसते. महाराष्ट्र राज्याची लॉटरी लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी सर्वांनी धरून ठेवली असता अजूनही कोणतीच तयारी राज्य सरकार कडून दिसत नाही. त्यामुळे राज्यातील आठ लाख लॉटरी लोकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

उर्वरित पृष्ठ 4 वर

## ऑनलाइन लॉटरी

# राज्य सरकार उदासीन

**मुंबई-** 'एक देश, एक कर' या घोषवाक्याने जीएसटीचे गेल्या वर्षी १ जुलै रोजी सर्व देशाने स्वागत केले. परंतु 'एक देश, एक कर' या ब्रीदवाक्याने अनेक व्यवसायांतील घटकांवर अन्यायदेखील झाला. त्यापैकी लॉटरी उद्योग २८ टक्के जीएसटी लादल्याने मरणयातना भोगत आहे. सध्या महाराष्ट्रातील लॉटरी उद्योगाबद्दल विचार केला तर ८५ टक्के उद्योग बंद झाला आहे. पूर्वी पेपर लॉटरी होती, त्यानंतर संगणकाची सुरुवात झाली. त्यामुळे लॉटरी उद्योगात असणारे व पेपर लॉटरीमधील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळाला. तीन-चार वर्षांत बेकारीचे निर्मूलन झाले. पूर्वीचे पेपर लॉटरीवाले, त्यात संगणक लॉटरी चालवणाऱ्यांची संख्या विचारात घेता व्यवसाय सुस्थितीला आला.



उर्वरित पृष्ठ 2 वर

# प्लास्टिकपेक्षा महापालिकांचे अर्धवट मलनि:सारण प्रकल्प प्रदूषणकारी!

**मुंबई- पर्यावरण विभागाने जी प्लास्टिकबंदी लादली आहे त्याच्यामुळे होणाऱ्या प्रदूषणापेक्षा किती तरी जास्त प्रदूषण राज्यातील महापालिका, नगरपालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नसलेल्या किंवा अर्धवट क्षमतेच्या मलनि:सारण प्रकल्पांमुळे होत आहे. मुंबई महापालिकेसारखी देशातील सर्वात मोठी महापालिका जवळपास वीस टक्क्यांपेक्षा जास्त मलमिश्रित पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय अरबी समुद्रात सोडत असून धक्कादायक बाब म्हणजे राज्यातील २७ महापालिकांपैकी १० महापालिकांकडे स्वतःचा मलनि:सारण प्रकल्पही नाही.**

सर्व महापालिकांसह स्थानिक स्वराज्यसंस्थांमधून सुमारे ४० टक्के मलयुक्तपाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नद्या व खाड्यांमध्ये सोडण्यात येते. मुंबई महापालिकेच्या आकडेवारीनुसार रोज अरबी समुद्रात ४९० दशलक्ष लिटर मलमिश्रित पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय सोडले जाते. त्याचप्रमाणे झोपडपट्ट्या तसेच ज्या ठिकाणी मलनि:सारण वाहिन्यांशी जोडणी नाही असे २० टक्के मलयुक्तपाणी प्रक्रियेशिवायच राहत असल्याचे पालिकेच्याच एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. याशिवाय अकोला, मालेगाव, अहमद नगर, धुळे, जळगाव, वसई-विरार, चंद्रपूर, उल्हासनगर, लातुर व परभणी अशा दहा महापालिकांमध्ये मलनि:सारण प्रकल्पच उभारण्यात आले नसल्याने तेथील मलयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नदी व खाडीत सोडण्यात



येत असल्याचे राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. राज्यात सुमारे सात हजार दशलक्ष लिटर मलयुक्तपाणी दररोज तयार होत असून त्यापैकी सुमारे चाळीस टक्के सांडपाणी अथवा मलयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नद्या व खाड्यात सोडण्यात येत असून यामुळे तसेच औद्योगिक प्रदूषणामुळे राज्यातील ४९ नद्यांचे पट्टे प्रदूषित होत असतात. याव्यतिरिक्त अनेक महापालिकांकडे पूर्ण क्षमतेचे मलनि:सारण प्रकल्प नसल्यामुळे अनेक महापालिकांमधून मोठ्या प्रमाणात प्रदूषित पाणी सोडण्यात येते. सांडपाण्यावर प्रक्रिया करताना त्याचे प्रमाण मोजण्यासाठी बायोलॉजिकल ऑक्सिजन डिमांडचा विचार केला जात असून हे प्रमाण १०० मिलिग्राम प्रति लिटर एवढे असणे आवश्यक असते.

# 'भंगार' विमाने पुरविणाऱ्या कंपनीवर कारवाई करा!

**मुंबई- उभ्या मुंबईचा थरकाप उडविणाऱ्या घाटकोपरच्या विमान दुर्घटनेनंतर यूवाय एव्हिएशनच्या हवाई वाहतूक डव्यवसायातील व्यवहारांवर असंख्य प्रश्नचिन्हे उमटू लागली असून, कालच्या दुर्घटनेच्या तपासातून या कंपनीच्या बेफिकीर कारभाराचे बुरखे फाडले जावेत, अशी अपेक्षा या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होत आहे. सरकारने गांभीर्याने तपास करून या क्षेत्राला काळिमा लावणाऱ्या या कंपनीचे पितळ उघडे पाडावे व मानवी जिवाशी खेळ करण्याचे धंदे बंद करावेत, असा सूरही या क्षेत्रात उमटत आहे.**

उत्तर प्रदेश सरकारने भंगारात काढलेले व कित्येक वर्षे जमिनीवरच असलेले यूवाय एव्हिएशनचे हे विमान गुरुवारी नारळ फोडून हवेत उडविण्यात आले, आणि काही मिनिटांतच पाच जणांचा बळी घेत ते दुर्घटनाग्रस्त झाले. खराब हवामान आणि विमानाची तंदुरुस्ती हे दोन्ही मुद्दे विचारात न घेताच या विमानाचे उड्डाण करण्यास भाग पाडल्यामुळेच हा अपघात झाला, असे दुर्दैवी मृतांच्या कुटुंबीयांचे म्हणणे असल्याने या दुर्घटनेचे गांभीर्य वाढले आहे. या विमानाची मालकी उत्तर प्रदेश सरकारकडे असतानाच त्याला



झालेल्या अपघातानंतर २०१४ मध्ये ते विक्रीस काढण्यात आले, तेव्हा ते उड्डाणाच्या स्थितीत नसल्याने सुटे भाग करून कंटेनरमधून वाहतूक करून ते मुंबईत आणण्यात आले व सुटे भाग पुन्हा जोडून त्याचे विमान बनविण्यात आले. उड्डाणासाठी आवश्यक असलेले विविध परवाने मिळविण्यास संबंधिक यंत्रणांकडे प्रचंड पाठपुरावा करावा लागतो. पण या कंपनीस मात्र, वापरण्यास योग्य नसलेली विमाने वा हेलिकॉप्टर सेवेत आणण्यासाठी कमीत कमी प्रयासात सारे परवाने कसे प्राप्त झाले याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

# मुंबई उपनगरातील वीज व्यवसाय रिलायन्सकडून अदानींच्या ताब्यात

**मुंबई-** अनिल धीरूभाई अंबानी समूहातील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कर्जाच्या डोंगराखाली असलेल्या कंपनीचा मुंबई उपनगरासाठीचा वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरणाचा एकात्मिक व्यवसाय विकत घेण्यासाठी गुजरातमधील अदानी समूहाने केलेल्या १८ हजार ८०० कोटींच्या व्यवहाराला राज्य वीज



नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे. यातून कंपनीवरील सर्व कर्ज फेडून तीन हजार कोटी रुपये रिलायन्सच्या तिजोरीत शिल्लक राहतील. रिलायन्स-अदानी व्यवहाराला रिलायन्सच्या भागधारकांची आणि केंद्रीय स्पर्धा आयोगाची (कॉम्पिटिशन कंपनी ऑफ इंडिया) परवानगी आधीच मिळालेली आहे. आता राज्य वीज नियामक आयोगाची मंजुरी मिळाल्याने जुलै २०१८ अखेपर्यंत उभय कंपन्या आर्थिक देवाणघेवाण आणि कागदोपत्री व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर हा वीज व्यवसाय अदानी ट्रान्समिशन लि.च्या ताब्यात जाईल, असे रिलायन्सच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

अनिल धीरूभाई अंबानी समूह आर्थिक संकटात असून मार्च २०१७ अखेर समूहातील विविध कंपन्यांवर एकूण सव्वा लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. त्यामुळे आपल्या विविध व्यवसायांची विक्री करून कर्ज फेडण्याचा मार्ग समूहाचे प्रमुख अनिल अंबानी स्वीकारला. त्यानुसार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या अखत्यारीतील डहाणूचा ५०० मेगावॉटचा वीजनिर्मिती प्रकल्प, वीज पारेषण यंत्रणा आणि मुंबईतील वीज वितरण व्यवसाय असा एकात्मिक वीज व्यवसाय विकण्यासाठी अदानी समूहासह त्यांची बोलणी होऊन डिसेंबर २०१७ मध्ये १८ हजार ८०० कोटी रुपयांना व्यवहार ठरला. केंद्रीय वीज कायद्यानुसार अशा व्यवहाराला राज्य वीज नियामक आयोगाची मंजुरी बंधनकारक असते. त्यामुळे याबाबत वीज आयोगात अर्ज करण्यात आला होता. त्यावर १४ जून रोजी अंतिम सुनावणी होऊन आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील राज्य वीज नियामक आयोगाने रिलायन्स-अदानी व्यवहाराला मंजुरी दिली.

# मुंबईतील ब्रिटिशकालीन इमारतींना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान

**मुंबई-** मुंबईतील ब्रिटिशकालीन इमारतींना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्टेशन पासून ते गेटवे ऑफ इंडिया पर्यंतच्या अनेक इमारती ब्रिटीशकालीन आहेत. या इमारती आजही आपला दिमाख कायम राखत डौलदारपणे उभ्या आहेत आणि मुंबईच्या सौंदर्यात भर घालत आहेत. आता याच इमारतींपैकी काही इमारतींना युनेक्सोकाच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. मुंबईसाठी ही नक्कीच गौरवास्पद बाब ठरली आहे. १९ व्या शतकातील व्हिक्टोरियन



संरचना आणि २० व्या शतकातील आर्ट डेको इमारतींचा यात समावेश आहे. शनिवारी बहरिन येथे झालेल्या युनेस्को जागतिक वारसा समितीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. हेरिटेज परवाना फोर्ट प्रेसिंक्ट आणि मरीन ड्राईव्ह प्रेसिंक्ट या दोहोंमध्ये विभागलेला आहे. मुंबई विद्यापीठ इमारत, जुने सचिवालय, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, डेव्हिड ससून ग्रंथालय. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, पश्चिम रेल्वे मुख्यालय आणि आर्ट डेकोच्या सार्वजनिक इमारतींचा समावेश आहे.

# छगन भुजबळ हेच घोटाळ्याचे सूत्रधार!

**मुंबई-** आपण निर्दोष असून आपल्यावर अन्याय झाला असे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ सांगत असले तरी भुजबळांवरील आरोपांबाबत सक्तवसुली संचालनालय ठाम आहे. या संपूर्ण घोटाळ्याचे भुजबळ हेच सूत्रधार असल्याचा आरोप संचालनालयाने नव्याने दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्रात केला आहे. छगन भुजबळ यांनी संपूर्ण घोटाळ्यात आपल्या मंत्रिपदाचा गैरवापर केला आणि राज्य शासनाची फसवणूक केली, असा आरोपही यात करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सदन आणि सांताक्रूझ-कालिना येथील राज्य ग्रंथालय या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन स्वतंत्र गुन्हे दाखल



केले. त्यापाठोपाठ संचालनालयानेही दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करून छगन व समीर भुजबळ यांना अटक केली. ते दोघेही सध्या जामिनावर आहेत. संचालनालयाने तिसरा गुन्हा दाखल करीत पुरवणी आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले. या गुन्ह्यात भुजबळ यांच्यासह इतर सर्वांनी जामिनासाठी अर्ज तयार ठेवले होते. परंतु फक्त दिलीप खैरे हे नवे संशयित आरोपी असल्याचे स्पष्ट करीत त्यांना जामीन मंजूर केला आणि ६ ऑगस्टपर्यंत सुनावणी पुढे ढकलली. महाराष्ट्र सदन व इतर प्रकरणात राज्य शासनाचे ८४० कोटींचे नुकसान झाले. त्यास भुजबळ हेच जबाबदार आहेत, असे आरोपपत्रात नमूद आहे. २९१ कोटींच्या मालमत्तेचा आतापर्यंत संचालनालयाला शोध घेता आला आहे. २००७ ते २०१० या काळात १२३ कोटी रुपये सुरेश जाजोदिया, चंद्रशेखर सारडा, प्रवीण जैन आणि संजीव जैन यांच्यामार्फत विविध कंपन्यांत गुंतवून त्या मोबदल्यात समभाग घेतल्याचेही दाखविण्यात आले असले तरी हे बनावट व्यवहार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परवेझ कन्स्ट्रक्शन या कंपनीला ७० कोटी रुपये १९ कंपन्यांकडून मिळाले आहेत तर आर्मस्ट्राँग एनर्जी प्रा. लि. या कंपनीला १८ कंपन्यांकडून ५१ कोटी मिळाले आहेत.

# लाईफलाईन ठरतेय जीवघेणी, लोकलमधून पडून ३ दिवसात १७ मृत्यू

**मुंबई-** मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर चालणाऱ्या लोकल्स या मुंबईच्या जीवनवाहिनीच समजल्या जातात. मात्र मागच्या तीन दिवसात याच दोन मार्गावर लोकलमधून पडून एकूण १७ जणांचा मृत्यू झाला आहे. २६ जून ते २८ जून या तीन दिवसांच्या कालावधीत हे सगळे मृत्यू झाले आहेत. फेसबुक या सोशल नेटवर्किंग वेबसाईटवर



Mumbai Train updates नावाचे एक फेसबुक पेज आहे. या फेसबुक पेजचे ॲडमिन मंदार अभ्यंकर यांनी ही माहिती पोस्ट केली आहे. २६ जून रोजी ३ जण ठार झाले आहेत तर ११ जण जखमी झाले आहेत. पालघर स्थानकात १, वसई रोड स्थानकात १ तर वडाळा स्थानकात १ मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. या दिवशी एकूण ११ जण जखमी झाले आहेत. २७ जूनला एकूण ६ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे तर ४ जण जखमी झाले आहेत. तर २७ जूनला ८ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे आणि ५ जण जखमी झाले आहेत. मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावरून धावणाऱ्या लोकल या मुंबईच्या लाईफलाईन मानल्या जातात. मात्र याच लाईफलाईन मुंबईकरांसाठी जीवघेण्या ठरत आहेत.

# ध्वनिप्रदूषणाने त्रस्त नागरिकांचे काय?

**मुंबई-** मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम दिवसरात्र केले जावे की नाही हा मुद्दा नाही तसेच मुंबईसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी दिवसरात्र काम करण्यास आमचाही विरोध नाही. परंतु असे असले तरी आणि ध्वनिप्रदूषण नियम मेट्रो प्रकल्पासाठी लागू होऊ शकत नाही हा सरकारचा दावा मान्य केला तरी प्रदूषणमुक्त वातावरण उपभोगण्याचे, ते उपलब्ध होण्याच्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे काय? त्याचे संरक्षण सरकार कशाप्रकारे करणार? लोकांना या कामाचा त्रास झाल्यास त्यांना दाद मागण्याच्या यंत्रणेचे काय? अशी प्रश्नांची सरबत्ती उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुंबई मेट्रो रेल महामंडळाकडे (एमएमआरसीएल) केली. तसेच सोमवारपर्यंत त्यावर खुलासा करण्याचे आदेशही दिले.



'मेट्रो-३'च्या कफ परेड येथील भुयाराचे काम जलदगतीने पूर्ण करता यावे याकरिता दिवसरात्र (२४ तास) काम करू देण्याच्या मागणीसाठी मुंबई मेट्रो रेल प्राधिकरणाने (एमएमआरसीएल) उच्च न्यायालयात याचिका केली आहे. या कामाच्या वेळी ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन होणार नाही, अशी हमी देण्याबाबत प्राधिकरणाने कुठलेही वक्तव्य करण्यास नकार दिला होता. न्यायमूर्ती अभय ओक आणि रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी शुक्रवारी सुनावणी झाली. त्या वेळी पर्यावरण संरक्षण कायदा आणि ध्वनिप्रदूषण नियम मेट्रोच्या कामांना लागू होतात की नाही, असा सवाल न्यायालयाने प्राधिकरणाला केला. त्यावर मेट्रोच्या कामांना हे दोन्ही कायदे लागू होत नसल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला. मेट्रोला कोकण रेल्वे कायदा लागू असून पर्यावरण संरक्षण कायद्यातून कोकण रेल्वे प्रकल्पाला वगळण्यात आले होते. परिणामी ध्वनिप्रदूषण नियमही त्याला लागू होऊ शकत नाही, असे महाधिवक्त्यांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. मात्र सरकारचा हा दावा मान्य केला आणि प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेतले तरी प्रदूषणमुक्त वातावरण उपभोगण्याचा, ते उपलब्ध होण्याच्या नागरिकांना घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराचे काय, या अधिकाराचे संरक्षण करण्याकरिता सरकार ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन करणार नाही का, असा उलट सवाल न्यायालयाने केला.

# 'मालमत्तेच्या कोणत्याही वादावर निर्णय घेण्याचा अधिकार न्यायालयाला'

**मुंबई-** राज्यातील जमिनीशी निगडीत कोणत्याही वादावर न्यायनिवाडा करण्याचा अधिकार हा कायद्यानुसार दिवाणी न्यायालयाला आहे. मंत्र्यांना याबाबतचे निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असे स्पष्ट करत मावळ येथील एका जमीन प्रकरणात महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मार्च महिन्यात दिलेला निर्णय उच्च न्यायालयाने नुकताच रद्द केला.

मावळस्थित उषा भौमिका यांनी आपल्या जमिनीचा विकास करण्यासासंदर्भात रमेश मोदी आणि भरत मोदी यांच्यासह अन्य दोनजणांसोबत करार केला होता. भौमिका आणि मोदी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार मोदी यांनी भौमिका यांना ठराविक रक्कम देऊन खरेदीखत आणि पॉवर ऑफ ॲटर्नीबाबच नोंदणी करून घेतली. पुढे भौमिका यांचा मृत्यू झाला. त्यामुळे रमेश मोदी यांनी ती जमीन स्वत:च्या नावावर करून घेतली.



परंतु भौमिका यांचा नातू सिद्धार्थ याने मोदी यांच्या कृतीला आक्षेप घेतला आणि व्यक्तीच्या मृत्यूनंतर जमिनीबाबत केलेले मुख्यारपत्रही रद्द होत असल्याचा दावा केला. त्याचा हा दावा तलाठी आणि प्रांत अधिकाऱ्यांकडूनही मान्य करण्यात आला. त्याविरोधात मोदी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली.

त्यावर मोबदला घेऊन मुखत्यारपत्र तयार केले तर ते रद्द होऊ शकत नाही, असा निर्वाळा त्यांनी दिला आणि मोदी यांना दिलासा दिला. या निर्णयाविरोधात भौमिका यांच्या नातवाने अतिरिक्त आयुक्तांकडे धाव घेतली. अतिरिक्त आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांचा हा निर्णय रद्द केला. परंतु हे सगळे इथेच थांबले नाही, तर प्रकरण महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचले. महसूल मंत्र्यांनीही सुरूवातीला अतिरिक्त आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती दिली. मात्र नंतर ह स्थगिती उठवत संबंधित करार रद्द करण्याचा अतिरिक्त आयुक्तांचा निर्णय कायम ठेवला.

पृष्ठ १ वरुन

## ऑनलाइन लॉटरी...

त्या संगणक लॉटरीचा स्वीकार लॉटरीप्रेमींनी केला आणि लॉटरी उद्योगाला चांगले दिवस आले.

केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार 'एक देश, एक कर' या योजनेनुसार लॉटरीवर २८ टक्के जीएसटी लावून या उद्योगावर अन्याय झाला तो असा. महाराष्ट्र राज्याची लॉटरी महाराष्ट्रात विकली तर १२ टक्के. तीच लॉटरी इतर राज्यांत विकल्यावर २८ टक्के जीएसटी कर आकारण्यात येतो. मग 'एक देश, एक कर' कसा! केंद्र सरकारच्या २८ टक्के जीएसटीच्या कर आकारणीमुळे लॉटरी उद्योगावर अन्याय झाला.

जीएसटी अमलात येऊन १ जुलै २०१८ रोजी एक वर्ष पूर्ण झाले. केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्य लॉटरीला १२ टक्के जीएसटी लावल्यानंतरही राज्य सरकार ऑनलाइन लॉटरी आणण्यात उदासीन आहे. अनेक बैठकांनंतर कोणतेही पाऊल टाकण्यास सरकार असमर्थ आहे. हा उद्योग शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी खऱ्या अर्थाने वाचवला. २८ टक्के जीएसटीच्या आधी लॉटरी विक्रेता सुखाने दोन घास खात होता. आता लॉटरी उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांइतकेच किंवा त्यांच्या खालोखाल विक्रेते लॉटरी उद्योगात गुंतले आहेत. त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न लक्षात घेऊन महाराष्ट्रातील बेरोजगारीचा प्रश्न विचारात घेऊन महाराष्ट्र सरकारने या विषयाचा गांभीर्याने विचार करून हा उद्योग कसा चालू राहील याबाबतीत पाऊल उचलणे गरजेचे होते. महाराष्ट्रातील उद्योगात बेरोजगारीचा प्रश्न आहेच, पण हा उद्योग चालू राहिल्यास शासनाला ५०० ते १००० कोटींचा महसूल मिळेल असे अनेक संघटनांमार्फत प्रस्ताव देण्यात आले. येत्या दोन महिन्यांत महाराष्ट्र राज्याची ऑनलाइन लॉटरी सुरू होईल अशी आश्वासने मिळत आहेत. यावरून सरकार महाराष्ट्राची ऑनलाइन लॉटरी आणण्यास उदासीन आहे. याचाच अर्थ हा व्यवसाय पूर्ण बंद व्हावा असा डाव तर नाही ना, असे विक्रेत्यांना वाटत आहे.

सरकारने लॉटरी उद्योगाबाबतीतील आपली भूमिका लवकरात लवकर स्पष्ट करावी. जीएसटी अमलात आल्यानंतर केरळ सरकारची २८ टक्के जीएसटीची भूमिका पूर्ण देश मान्य करतो. या मागणीपुढे सर्व राज्ये हतबल होतात. सध्या केरळ सरकार स्वतःच्या लॉटरीच्या माध्यमातून महसूल वाढून ते राज्य सक्षम होते.

केरळ सरकार लॉटरीच्या माध्यमातून कसं सक्षम आहे याबाबत विचार करून त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारचा महसूल ५०० ते १००० कोटी असा जाईल याचा विचार करणे आता गरजेचे आहे. आजची परिस्थिती या उद्योगात बेरोजगारी वाढते आहे हे लक्षात येऊनही महाराष्ट्र सरकार महाराष्ट्र राज्याची ऑनलाइन लॉटरी आणण्यास उदासीन आहे अशाच निर्णयाप्रत विक्रेते आलेले आहेत.

## ८ तास कर्तव्याचा...


८ तास कर्तव्यातही बदल होऊन पूर्वी प्रमाणे परिस्थिती होईल, असे मुंबई पोलिसांना व त्यांच्या कुटुंबीयांना वाटत होते. पण कार्यालयीन आदेश जारी झाल्याने ८ तास कर्तव्याचे कायम राहणार आहेत.

'८ तास कर्तव्या'मुळे पोलीस ठाण्यातील प्रत्येक काम सर्वांच्या वाट्याला येते. या नियोजनामुळे मुंबई पोलिसांना खात्यांतर्गत हरएक कामाचा अनुभव मिळत आहे. ८ तासांमुळे पोलिसांना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळू लागला आहे. परिणामी पोलिसांमधील मृत्यूचे प्रमाण देखील कमी झाले आहे. याचे सर्वश्री क्षेय तत्कालीन पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर व पोलीस कॉस्टेबल पाटील यांचेच आहे. पडसलगीकर व पाटील यांनी मुंबई पोलीस खात्याच्या इतिहास केलेली ही अनोखी नोंद कायम स्मरणी राहील.

# मुंबईचा पाया खचला आहे, उद्या शहर कोसळेल

**वडाळ्यात जमीन खचून झालेल्या दुर्घटनेनंतर लगतच्या गगनचुंबी इमारतींमधील रहिवाशांच्या पायाखालची जमीनच सरकली. यानिमित्ताने पुन्हा मुंबईचा पाया, विकास प्रकल्प, महापालिकेचे कुचकामी धोरण, कायद्याची होणारी पायमल्ली, विकासकांचा मनमानी कारभार; असे अनेक मुद्दे चर्चेला आले. याच मुद्द्यांवर बोट ठेवत दुर्घटनांना नेमके कारणीभूत कोण, कोणाचे कुठे आणि काय चुकते आहे, खरेच मुंबईचा पाया खचला आहे का?**

'मुंबईचा पावसाळा. नेमेची येतो. येतो तोच संकटांची मालिका घेऊन. संकटांचे स्वरूपही नेहेमीचेच. मिठीला पूर, झोपडवस्त्यांत पाणी; डोंगर उतार, रस्ते, जमिनी खचणे, सखल भागांत पाणी, जुन्या इमारतींची, झाडांची पडापड, रस्त्यावर आणि रेल्वेमार्गावर पुराचे पाणी, वाहतुकीचा बट्ट्याबोळ, विस्कळीत जनजीवन, उंच इमारतींमधील अपघात आणि अग्निशमन दलाची धावाधाव. गेली अनेक दशके तेच घडत आले आहे आणि संकटांची संख्या, तीव्रता, जीवितहानी आणि नुकसान, लोकांचे हाल. त्याच बातम्या, तेच वर्तमानपत्री मथळे आणि तेच तेच दोषारोप. मुंबईतील नैसर्गिक वा इतर कोणत्याही नागरी समस्यांचे खापर नेहमी मुंबईमध्ये असलेल्या- नसलेल्या प्रशासकीय यंत्रणेवर फोडण्याची प्रथा पडली आहे. पण ही यंत्रणा इतकी क्लिष्ट आणि मोठी आहे; आणि सातत्याने दुषणे घेत कोडगी झालेली आहे. हे प्रशासनाला इतके सवयीचे झाले आहे की त्यामुळे प्रशासन कोडगे तर शहराचे नगरसेवक आणि राज्यकर्ते बेजबाबदार बनले



आहेत. गेंड्याची कातडी पांघरलेले लोकशाही सरकार किंवा इतर काहीही विशेषणे लावली तरी हलणे, हलविणे आणि सुधारणे दिवसेंदिवस अवघड बनत आहे. वडाळा येथील अण्टॉप हिल भागातील उच्चभ्रू, उत्तुंग इमारतींमधील रहिवाशांच्या प्रतिक्रिया आल्या आहेत.

## संपादकीय...

# आकाशातले खड्डे!



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

मृत्यू हे परमसत्य. ते कोणीही टाळू शकत नाही. त्यापासून कोणी पळू शकत नाही. प्रत्येकाचे मरण हे ठरलेलेच असते. ते जेव्हा, जेथे आणि जसे यायचे तेव्हा, तेथे आणि तसेच येणार. कोणी झाडाखालून चाललेला असतो. वरून फांदी डोक्यावर पडते. तो मरतो. कोणाचे वाहन खड्ड्यात आदळते. चाक फुटते. गाडी नदीत पडते. बुडून माणसे मरतात. कोणी नदीत बुडते, कोणी चालता चालता गटारद्वारात गडप होऊन मरते. एखादी इमारत कोसळते. नाकातोंडात माती जाऊन माणसे मरतात. कारण? त्यांचे मरण तेथेच ठरलेले होते. तेव्हा त्याबद्दल दोष तरी कोणी कोणाला द्यायचा? माणसे मेली की मागे उरलेली त्याचा शोक करतात, रडतात, भेकतात, चिडतात. कोणाकडे तरी बोट दाखवून रागही काढतात. सरकारी यंत्रणांचा त्याच्याशी संबंध असेल, तर चौकशीची मागणी होते. आयोग स्थापिले जातात. काही दिवसांनी सारे शांत होते. गेलेल्यांना सगळे विसरून जातात. कारण.. प्रत्येकाचा मृत्यू हा कधी, कुठे, कसा हे ठरलेले आहे. तो तसा, तेथे, तेव्हा झाला, तर झाला. तो काळ आणि ती वेळ टाळणे हे



का मनुष्याच्या हातात असते? हा आपला नियतीवाद, दैववाद. असंख्य लोक त्याच्या आधारे निवांत सोपेपणाने दु:ख पचवताना दिसतात. किंबहुना नियतीवादाचा हेतूच तो असतो. परंतु त्याने मृत्यूची वेदना हलकी होत असली, तरी जगणे सुंदर होत नसते. होऊच शकत नाही. कारण या नियतीवादाच्या पोटातच जगण्याबद्दलची प्रच्छन्न बेफिकिरी दडलेली असते. ती माणसांत असते, तशीच समाजव्यवस्थेतही. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे परवा मुंबईत भरवस्तीमध्ये झालेला विमान अपघात.

माणसे किती मृत्युमुखी पडली यावर आपल्याकडे अपघाताची तीव्रता ठरविण्याची एक पद्धत आहे. त्यानुसार छोटासाच म्हणावा लागेल हा अपघात. त्यात पाच जणांचा मृत्यू झाला. याहून किती तरी लोक रोज रस्ते अपघातात मरतात आपल्याकडे. गेल्या एका वर्षात रस्त्यांवरील अपघातांनी एकंदर दीड लाख बळी घेतले होते. मुंबईत रोज सरासरी चार माणसे रेल्वे ट्रॅक ओलांडताना मारली जातात. त्या तुलनेत या विमानाचा अपघात लहानच म्हणावा लागेल. परंतु ते तसे नाही. हा अपघात गंभीरच मानला पाहिजे. याचे कारण एक तर हे विमान जर भलतीकडेच कुठे कोसळले असते, तर त्यातील बळींची संख्या काही पटींनी वाढू शकली असती. घाटकोपरचा तो भाग गजबजलेला. गगनचुंबी इमारतींचा. तेथून काही अंतरावरच रेल्वे स्थानक. काहीही होऊ शकले असते. दुसरी बाब म्हणजे असे विमान अपघात ही कधी तरीच घडणारी दुर्घटना असते. ती घडू नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले असतात. त्यामागे अत्याधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान असते, मानवी चुकांना वाव राहू नये यासाठी केलेले प्रयत्न असतात, त्यामागे असंख्य अभियंते, तंत्रज्ञ आणि कर्मचारी यांचे हात असतात आणि एवढे करूनही जर विमान अपघातग्रस्त होत असेल, तर तो आधुनिक विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा, मानवी प्रज्ञेचा पराभव ठरतो. ती निश्चितच अत्यंत गंभीर घटना ठरते. या पार्श्वभूमीवर मुंबईतील विमान अपघाताकडे पाहता काय दिसते? ती विज्ञान-तंत्रज्ञानाची हार होती? मानवी प्रज्ञेचा पराभव होता? त्यात दिसत होती ती इतरांच्या जीवनाबद्दलची उद्दाम बेफिकिरी. आता समोर येत असलेल्या बातम्यांतून हेच दिसते आहे, की चाचणीसाठी उडविण्यात आलेल्या त्या बारा प्रवासी क्षमतेच्या विमानाला उड्डाण परवानाच नव्हता. ते मूळचे उत्तर प्रदेश सरकारच्या मालकीचे विमान. २००८ मध्ये त्याचा अपघात झाल्यानंतर ते उडण्याच्या लायकीचे उरले नाही. एका ट्रकवर लादून ते मुंबईत आणण्यात आले. येथे त्याची दुरुस्ती करण्यात येत होती. गेल्या गुरुवारी, तब्बल नऊ वर्षांनी ते हँगरमधून धावपट्टीवर आणण्यात आले. कशासाठी? तर उड्डाणाची चाचणी घेण्यासाठी. आकाश काळ्या ढगांनी भरलेले. कुठे कुठे मुसळधार पावसाच्या सरी कोसळत आहेत. दृश्यमानता कमालीची कमी झालेली आहे. चारचाकी वाहन बाहेर काढताना मुंबईकर दोनदा विचार करील अशा त्या वातावरणात कोणता शहाणा माणूस, गेली नऊ वर्षे ज्याने उड्डाणच केलेले नाही असे विमान चाचणीसाठी बाहेर काढील? परंतु ते काढले गेले. ही सर्व दंडनीय अशी बेफिकिरीच. ती केवळ नियम आणि कायद्यांबाबतच असते, असे नाही. तसेच ती केवळ याच घटनेपुरती मर्यादित आहे असेही नाही. भारतातील विमान उड्डाण क्षेत्राच्या पंखातच ती भरलेली आहे. आपल्याकडे 'बॅज' नसलेले म्हणजेच परवाना नसलेले रिक्षाचालक असतात. त्याचप्रमाणे विमानोड्डाणाचा परवाना नसलेले वैमानिकही असतात. प्रवासी घेऊन ते विमानोड्डाण करतात आणि ते उघडकीस येऊनही आपल्याला त्याचे काहीही वाटत नाही. याचे कारण आपला नियतीवाद. आपल्याकडे सावळागोंधळ असलेली बस स्थानके असतात.

**'मुंबई ही पूर्वी आठ बेटांची नगरी होती. आठ बेटे एकत्र करून समुद्रात भराव टाकून वसाहत स्थापन करण्यात आली होती. वडाळ्यात झालेल्या प्रकारामध्ये मातीचा भराव टाकून मानवी कृती करण्यात आली होती. कुठल्याही भागात वस्ती तयार करत असताना, एक म्हणजे, भौगोलिक दृष्टीकोनातून प्राकृतिक रचनेचा अभ्यास करावा लागतो. दुसरे, भूगर्भीय दृष्टीकोनातून भूअंतर्गत क्रियांचा अभ्यास करावा लागतो.**



# भूगर्भाची रचना लक्षात घ्या
## अन् मगच उत्तुंग इमारती बांधा!

भूगर्भीय दृष्टीकोनातून खाली कोणत्या प्रकारचा खडक आहे. मृदेची रचना काय आहे? या सगळ्या गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. भूबाह्य प्राकृतिक रचनेचा, तसेच भौगोलिक घटकांचा विचार करता, पर्वत, पठारे, मैदाने यांचा अभ्यास करावा लागतो. राज्यातील दख्खनचे पठार हे ज्वालामुखीच्या उद्रेकापासून तयार झालेले पठार आहे. त्यामुळे ते स्थिर आहे, तसेच सह्याद्री पर्वतही स्थिर आहे. ब्रिटिश जेव्हा जगभर इमारती बांधत, तेव्हा ते सर्वांत आधी तेथील भौगोलिक परिसराचा अभ्यास करायचे. म्हणजेच प्राकृतिक रचना कशी आहे, हवामान कसे आहे, मृदा कशी आहे, नैसर्गिक वनस्पती कोणत्या आहेत, कोणता लाकूडफाटा, दगड उपलब्ध होणार आहेत, तेथील परिस्थिती काय आहे, तसेच भौगोलिक घटकांसोबत सामाजिक घटकांचाही अभ्यास केला जायचा. त्यामुळे ब्रिटिश काळातील इमारती २०० ते ३०० वर्षांपर्यंत टिकून राहिल्या आहेत, परंतु सध्याचे आरसीसी बांधकाम जास्त वर्षे टिकत नाही. कारण नैसर्गिक घटक आणि मानवी घटक यांच्या समन्वयाचा अभाव आहे. कोकणातील माती आणि लाकडाचा वापर करून बांधलेले वाडे १०० वर्षे टिकून राहतात. आरसीसीची घरे मात्र २० वर्षांत कोसळतात. यामागे मुख्य दोन कारणे आहेत. आरसीसीचे बांधकाम उन्हाळ्यात खूप तापते आणि हिवाळ्यात खूप थंड होते. परिणामी, नैसर्गिक साधनसंपत्तीने बनविलेली घरे उन्हाळ्यात व हिवाळ्यातही सौम्य राहतात. मानवाने पाश्चात्यांचे अंधानुकरण करण्याच्या नादात, हवामानाच्या परिसरामध्ये वन, टू आणि थ्री बीएचके घरे बांधली आहेत, परंतु पूर्वी हवामानानुसार घरांची रचना वेगवेगळी होती. मात्र, आता सगळीच घरे सारखी दिसून येतात. याचे कारण असे की, आपण आपल्या नैसर्गिक घटकांचा अभ्यास न करता कृती करायला लागलो. उच्च राहणीमानाची हाव, दळणवणाचा अवाजवी विकास, यांच्यामुळे अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या.

मुंबई ही अरबी समुद्रकिनारा आणि पश्चिम



घाट यांच्या चिंचोळ्या भागात विकसित झालेला भाग आहे. प्रामुख्याने मुंबई आणि मुंबई परिसरात जास्तीतजास्त भराव टाकून जमिनी तयार करण्यात आल्या आहेत. मुळात भूगोलाच्या दोन क्रिया किंवा कार्य होत असतात. एक वेगवान हालचाली आणि दुसरी हळुवार हालचाली. वेगवान हालचालीत ज्वालामुखी, भूकंप, भूस्खलन या वेगवान हालचाली असतात. हळुवार हालचालीला 'मास मूव्हमेंट' असेदेखील म्हणतात. एकंदरीत जमिनीचा वरचा थर हळूहळू उताराच्या दिशेने सरकत असतो. २० ते २५ वर्षांपूर्वीचे जुने विजेचे पोल पाहिले, तर ते हळूहळू झुकताना दिसतात, यालाच 'मास मूव्हमेंट' असे म्हणतात, पण ती प्रक्रिया काळाच्या तुलनेत हळुवार होत असल्यामुळे ती दिसत नाही. त्या मानाने भूकंप, ज्वालामुखी आणि कडे कोसळणे हे पटकन होत असल्याने ते आपल्याला दिसून येतात. नदीच्या खोऱ्यांचा विचार केला, तर पूर तट, पूर मैदाने ही मानवी वस्तीसाठी अयोग्य ठरविलेली असतात. कारण पूर तटापर्यंत पुराचे पाणी असते. पूर मैदानामध्ये नदी जेव्हा पुराची सीमा ओलांडते, तेव्हा पाणी पूर तटामध्ये जाते. मुंबई आणि किनारपट्टीच्या प्रदेशात 'कोस्टल रिक्लेमेशन झोन' (सीआरझेड) आणि 'रिव्हर रिक्लेमेशन झोन' (आरआरझेड) या दोन्ही गोष्टींचे मानवाने पालन केलेले नाही. मुंबईतील जमिनीच्या वरचा थर हा सगळ्यात अस्थिर असतो. तिथे जाड खडकाळ, वाळूचा भाग आणि मृदा जमा झालेली असते. गाळ जेव्हा नदी वाहून आणते, तेव्हा गाळ नदीच्या मुखाजवळ आल्यानंतर समुद्राचे खारट पाणी आणि नदीचे गोडे पाणी एकत्र होते. पाणी एकत्र आल्यानंतर समुद्राला जेव्हा भरती आलेली असते, तेव्हा वाहणारी नदी कुठेही न थांबता समुद्राच्या मुखाजवळ थांबावे लागते. ज्या वेळी पाणी थांबते, तेव्हा खडकाळ, वाळूचा भाग आणि मृदा त्याजागी जमा होतो. जेव्हा ओहोटी येते, तेव्हा पाणी निघून जाते आणि गाळ तिथेच जमा राहतो. कालांतराने गाळाचे थर एकमेकांवर साचून त्रिभूज प्रदेशाची निर्मिती होते.

# जन्म, मृत्यू, विवाह झाल्यास एक झाड लावणे बंधनकारक

**विरार- शहरात अधिकाधिक वृक्ष लागवडीसाठी वसई-विरार महापालिकने पुण्याच्या धर्तीवर वृक्ष दत्तक मोहीम सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत घरात कुणाचा जन्म झाला, विवाह झाला तर आनंदी वृक्ष, मृत्यू झाल्यास स्मृती वृक्ष लावावा लागणार आहे. पालिकेने पहिल्या टप्प्यात १८०० जणांची यादी तयार केली आहे.**

राज्य शासनाने सामाजिक वनीकरणाला प्राधान्य दिले आहे. त्यानुसार महापालिकेनेही शहरात वृक्ष लागवड करण्यावर भर दिला आहे. याचाच भाग म्हणून महापालिकेने आता वृक्षदत्तक



योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जन्म-मृत्यू झाल्यास तसेच विवाह झाल्यास एक वृक्ष दत्तक घेऊन त्याची जोपासना करावी लागणार आहे. याची माहिती देताना प्रभारी साहाय्यक आयुक्त (वने) सुरेंद्र पाटील यांनी सांगितले की, अपत्याचा जन्म होणे ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे जन्म झाल्यास पालकांनी एक झाड लावायचे, तसेच मृत्यू झाल्यास मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ स्मृतिवृक्ष लावायचा आहे. लग्न झालेल्या जोडप्यांनीही विवाह झाल्याच्या निमित्ताने आनंदी झाड लावायचे आहे. पालिकेकडे शहरातील जन्म-मृत्यू झाल्याची तसेच विवाह झाल्याच्या नोंदी असतात. त्यानुसार अशा लोकांची यादी बनवण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात महापालिकेने ९ प्रभागांतील जन्म-मृत्यू आणि विवाह झालेल्या कुटुंबीयांची यादी बनवली आहे. पालिकेचे कर्मचारी या कुटुंबांशी संपर्क साधणार आहे. झाड लावताना हमीपत्र घेण्यात येणार आहे. हे झाड जगल्यास संबंधित व्यक्तीला पालिकेकडून प्रमाणपत्रही दिले जाणार आहे. पालिकेने १८०० जणांची यादी बनवली आहे. प्रत्येक प्रभागातील ५० ते १०० जण पहिल्या टप्प्यात निवडण्यात आले आहे. मे आणि जून महिन्यात जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी झालेले निवडण्यात आले आहेत. हा उपक्रम वर्षभर सुरू राहणार आहे.

# खड्ड्यांमुळे 'अपघातांचे चौक'




**कल्याण-बदलापूर दरम्यानच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या रस्त्याची रखडपट्टी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यात पहिल्या पावसानंतर १५ किलोमीटरच्या या रस्त्यातील विविध चौक खड्ड्यात गेले आहेत. त्यामुळे भर पावसात वाहनचालकांना या अनपेक्षित खड्ड्यांचा सामना करावा लागतो आहे.**

या खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यताही वाढली आहे.पालघर जिल्ह्याच्या जव्हार या टोकापासून ते रायगडच्या खोपोलीपर्यंतच्या १५६ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्ग ४८ चा बराचसा भाग कल्याण ते बदलापूरमधून जातो. अवघ्या १५ किलोमीटरच्या या रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरणाचे काम एमएमआरडीएकडून गेल्या अनेक वर्षांपासून हाती घेण्यात आले आहे. मात्र अतिक्रमण हटविण्यात तसेच वेळीच निधी उपलब्ध करण्यात अडचणी आल्याने हे काम रखडले. त्यामुळे गर्दीच्या १५ किलोमीटरच्या या भागात गेल्या काही वर्षांत अनेक अपघात झाले. त्यात अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. या काळात या रस्त्याच्या विविध चौकात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहतूक मंदावली आहे. कल्याणपासून उल्हासनगर, अंबरनाथमार्गे बदलापूरला जाणाऱ्या या रस्त्यात सर्वच चौक वर्दळीचे आहेत. मात्र मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अंबरनाथचा फॉरेस्ट नाका, लादी नाका, शास्त्री विद्यालयाजवळील चौक, उल्हासनगरचा फॉरवर लाइन चौक, शिवाजी चौक, काजल पेट्रोल पंपाजवळील चौक येथे मोठमोठे खड्डे पडले आहेत.

# वसई-विरार शहरात एचआयव्हीचे ७२ रुग्ण

**नालासोपारा-** वसई-विरार शहरात पाच महिन्यांत ७२ जणांना एचआयव्हीची लागण झाल्याचे उघड झाले. एचआयव्हीबाधित रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे पालिका धास्तावली आहे. या रुग्णांच्या उपचारासाठी वालीव येथील नागरी आरोग्य केंद्रात एआरटी कक्ष सुरू करणार आहे.





एचआयव्ही रोगाबाबत जनजागृती केली जात असतानाही शहरात एचआयव्हीबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. मागील पाच महिन्यांत शहरात तब्बल ७२ एचआयव्हीबाधित रुग्णांची नोंद पालिकेच्या रुग्णालयात झालेली आहे. आमच्याकडे आलेल्या क्षयरुग्णांची तसेच गरोदर मातांची आम्ही तपासणी करत असतो. त्यात हे रुग्ण आढळल्याची माहिती पालिकेचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र चौहान यांनी दिली. जानेवारीत १८, फेब्रुवारीत १२, मार्चमध्ये १४, एप्रिलमध्ये ९ आणि मे महिन्यात १९ एचआयव्हीबाधीत रुग्णांची नोद पालिकेच्या रुग्णालयात झाली आहे. सध्या पालिकेकडे या आजारावर उपचार करण्याची सोय नाही. त्यासाठी पालिकेने शासनाच्या जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेशी चर्चा केली असून त्यांनी पालिकेला एचआयव्ही कक्षासाठी विनामूल्य औषधे देण्याचे मान्य केले आहे. वसई पूर्वेच्या वालीव येथील नागरी आरोग्य केंद्रात यासाठी एआरटीसी कक्ष उभारण्यात येणार आहे.

एआरटी म्हणजे अ‍ॅटी रॅट्रोव्हायरल थेरेपी सेंटर. एचआयव्हीबाधित रुग्णांना विशिष्ट औषधे घ्यावी लागतात आणि ती औषधे घेतल्यानंतर त्याचा परिणाम कसा होतो हे पाहण्यासाठी नियमित तपासण्या कराव्या लागतात. या तपासण्या एआरटी सेंटरमध्ये होतात. याबाबच माहिती देताना एड्स रोगावर काम करणाऱ्या कृपा फाऊंडेशनच्या अमित पटेल यांनी सांगितले की, एचआयव्हीबाधित रुग्णांसाठी लागणारी औषधे महाग असतात. यासाठी साधारण रुग्णाला दोन ते तीन हजारांचा खर्च येतो. मीरा रोडच्या इंदिरा गांधी रुग्णालयात ही औषधे मिळतात. मात्र गेल्या आठ महिन्यांत तेथे वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे वसईच्या रुग्णांना केईएम, जेजे, नायर किंवा ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात जावे लागते.

# कल्याण-भिवंडी मेट्रोला प्राधान्य

**कल्याण-** वडाळा-ठाणे मेट्रो प्रकल्पाच्या कामास सुरुवात केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आता ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले आहे. या



प्रकल्पातील स्थानके, कारशेड तसेच मार्गाची रचना ठरविण्यासाठी संरचना सल्लागाराची नेमणूक करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

मुंबईलगत असलेल्या उपनगरांमध्ये मेट्रो प्रकल्पांचे जाळे विणण्याच्या दृष्टीने गेल्या काही वर्षांपासून राज्य सरकारने प्रयत्न सुरु केले आहेत. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईत बेलापूर-तळोजा-पेंधार या मार्गावर मेट्रो मार्गाची उभारणी सुरू असताना ठाणे आणि आसपासच्या उपनगरांमध्येही या प्रकल्पांची आखणी करण्यात मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने सुरुवात केली आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून वडाळा-घाटकोपर-ठाणे मेट्रो प्रकल्पाच्या कामास नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे.

ठाणे मेट्रो प्रकल्पाचा गायमुखपर्यंत विस्तार करत असताना सरकारने ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाच्या आखणीकडे लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्पाचा मूळ आराखडा तसेच अंदाजित रकमेस मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या संचालक मंडळात यापूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे. हे करत असताना या मार्गावरील मेट्रो स्थानकांचे डिझाइन तसेच कारशेडची रचना कशी असावी हे ठरविण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. यासंबंधीची निविदा मागविण्यात आली असून येत्या दोन महिन्यांत सल्लागार नियुक्त केला जाईल, अशी माहिती एमएमआरडीएमधील सूत्रांनी दिली.

ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्गाची मार्गिका कोठून जाईल याविषयीचे आराखडे यापूर्वीच निश्चित करण्यात आले असून जमीन संपादन तसेच निधी उभारणीसाठी वाढीव चटईक्षेत्राच्या आखणीच्या प्रस्तावांना एमएमआरडीएच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वाढीव चटईक्षेत्राची आखणी करत मार्गालगत निवासी तसेच व्यावसायिक संकुलांची उभारणी आणि विक्रीतून निधी उभा करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी खासगीकरणाचा मार्ग स्वीकारला जाणार आहे. यासंबंधी धोरणात्मक निर्णय राज्य सरकारच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत असतानाच स्थानकांच्या उभारणीतील महत्त्वाचा टप्पा सुरू करण्यात आल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

# पालिकेच्या प्रवासी संख्येत घट

**वसई-** वसईतील राजरोसपणे सुरू असलेल्या बेकायदा प्रवासी वाहतुकीचा फटका पालिकेच्या परिवहन सेवेला बसला आहे. या बेकायदा वाहतुकीमुळे दिवसाकाठी पालिकेचे दहा हजार प्रवासी कमी झाले आहे. वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई होत नसल्याने खासगी प्रवासी वाहतूक वाढली आहे.

वसई विरार महापालिकेची परिवहन सेवा सध्या तोट्यात गेली आहे. शहरात बेकायदा प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनांचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे आणि 'अर्थ'पूर्ण संबंधामुळे बेकायदा प्रवासी वाहतूक फोफावली आहे. त्याचा फटका पालिकेच्या परिवहन सेवेला बसू लागला आहे. वसई-विरार महापालिकेची परिवहन सेवा मे. भगीरथी ट्रान्स्पोर्ट या ठेकेदारामार्फत चालवली जाते. दररोज ३८ मार्गावर ८०० फेऱ्या होत असतात. या बसमधून दररोज सुमारे १ लाख प्रवासी प्रवास करत असतात. परंतु परिवहन सेवेचे प्रवासी या खासगी बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांनी पळवले आहे. त्यामुळे दररोज दहा हजारांनी प्रवासी कमी झाल्याची माहिती परिवहन सेवा चालविणाऱ्या मे. भगीरथी ट्रान्स्पोर्टचे संचालक मनोहर सत्पाळ यांनी दिली. आमचे दररोज दहा ते बारा हजारांनी प्रवासी घटल्याचे सत्पाळ यांनी सांगितले. सर्वाधिक बेकायदेशीर प्रवासी वाहतूक ही वालीव आणि सातिवली मार्गावर होत असल्याचे ते म्हणाले.



वाहतूक पोलिसांनी बेकायदा प्रवासी वाहतुकीविरोधात कारवाई करत असल्याचा दावा केला आहे. मात्र चालू वर्षांतील पाच महिन्यांत केवळ ६३ जणांवर कारवाई झाली आहे. मे महिन्यात तर अवघ्या तीन वाहनांवर कारवाई झाली आहे. बेकायदा प्रवासी वाहतूक होत आहे ही वस्तुस्थिती आहे असे वाहतूक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपत पाटील यांनी सांगितले. मात्र त्याविरोधात कारवाई केली जाते. यापुढे अशा वाहतूकदारांवर कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.

# सरकारी उत्पन्नाच्या ऐतिहासिक पावलांत सर्वाधिक फायदा GST मुळे, ४ लाख कोटी रु. वाढणार

**नवी दिल्ली- देशातील गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (जीएसटी) ही सर्वात मोठी कर सुधारणा लागू होऊन आज एक वर्ष पूर्ण झाले. जीएसटीमुळे २०१८-१९ या चालू वित्त वर्षात सरकारच्या कर गंगाजळीत सुमारे ४ लाख कोटी रुपयांची वाढ होऊ शकते. जीएसटी कलेक्शनमुळे २०१८-१९ मध्ये २ लाख कोटी अतिरिक्त महसूल मिळू शकतो.**

दुसरीकडे प्राप्तिकरही २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मिळेल, अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे सरकारी तिजोरी भरण्यासाठी सरकारने जेवढी मोठी आणि ऐतिहासिक पावले उचलली आहेत, त्यात जीएसटी सर्वात मोठे पाऊल ठरत आहे. उदा. आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या कोळसा लिलावातून सरकारला २०१५ मध्ये ३२ कोळसा पट्ट्यांतून २.७ लाख कोटी रुपये




मिळाले होते. स्पेक्ट्रम लिलावाच्या सर्वात मोठ्या प्रयत्नात २०१६ मध्ये सरकारला सुमारे ६५ हजार कोटी रुपये मिळाले होते, तर उद्दिष्ट ५.६३ लाख कोटी मिळवण्याचे ठेवण्यात आले होते. २०१६ मध्ये सरकारने नोटबंदीचे ऐतिहासिक पाऊल उचलत प्राप्तिकरात ९० हजार कोटी रुपयांची वाढ केली होती. मोदी सरकारच्या इन्कम डिक्लरेशन स्कीमला विरोधी पक्षांनी फेअर अँड लव्हली स्कीम असेही म्हटले होते, त्या योजनेद्वारेही सरकारी तिजोरीत सुमारे ३० हजार कोटी रुपये आले होते.

आता जीएसटीचा विचार केल्यास सरकारने चालू आर्थिक वर्षात दर महिन्याला १ लाख कोटी जीएसटी वसुलीसह वर्षअखेरपर्यंत किमान १२ लाख कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट ठेवले आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षात जुलै ते मार्चपर्यंत जुलै ते मार्चपर्यंत जीएसटीच्या रूपाने ७.१९ लाख कोटी रुपये वसूल करण्यात आले. जीएसटीचा परिणाम प्राप्तिकर वसुलीवरही दिसला. अर्थ मंत्रालयानुसार, २०१७-१८ या गेल्या वित्त वर्षात २०१७-१८ मध्ये प्राप्तिकरातून १०.०२ लाख कोटी रुपये मिळाले होते. २०१६-१७ या वर्षाच्या तुलनेत ही रक्कम १८ टक्के जास्त आहे. २०१६-१७ मध्ये प्राप्तिकरातून ८.५ लाख कोटी रुपये मिळाले होते. कर तज्ज्ञांच्या मते जीएसटी रिटर्न फायलिंगमध्ये लावलेल्या कलमांमुळे चालू आर्थिक वर्षात प्राप्तिकराच्या वसुलीत २० टक्क्यांची वाढ होण्याचा अंदाज आहे.

# एकाच घरात 11 मृतदेह; 7 महिला, 4 पुरुषांचा समावेश

**नवी दिल्ली-** राजधानी दिल्लीतील उत्तरेकडील भागात असलेल्या बुराडी परिसरात धक्कादायक घटना पुढे आली आहे. येथील संत नगर परिसरात एकाच घरात एक दोन नव्हे तर, चक्क ११ व्यक्तिंचे मृतदेह आढळून आले आहेत. या मृतदेहांमध्ये ७ महिला तर, ४ पुरूषांचा समावेश आहे. सांगितले जात आहे की,



११ मृतदेहांपैकी काहींचे हातपाय बांधले होते. तर, काहींच्या डोळ्यांवर चिकटपट्टी लावली होती. एकाच घरात इतक्या मोठ्या प्रमाणावर मृतदेह मिळाल्यामुळे राजधानी दिल्ली हादरून गेली. तर, पोलीस दलात एकच खळबळ उडाली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांनी घटनास्थळावर तातडीने धाव घेतली. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार हे मृतदेह दोन कुटुंबांचे असून, त्यांची गळफास लाऊन हत्या केल्याचा संशय व्यक्त होत आहे. दरम्यान, पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून, पुढील तपास सुरू केला आहे. या व्यक्तिंनी सामूहिक आत्महत्या केली आहे की, हे हत्याकांड हे शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# एसटीच्या वेतनकराराला अखेर मंजुरी

**मुंबई-** एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा २०१६ ते २०२०च्या वेतनकराराला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे जुलै महिन्यापासून नवीन वेतनवाढ लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आता जून महिन्यात मिळणार पगार वाढीव असेल.

एसटी कर्मचाऱ्यांचा दर चार वर्षांनी वेतनकरार होतो. मात्र २०१६ ते २०२०चा वेतनकरार करण्यासाठी एसटी प्रशासन आणि मान्यता प्राप्त संघटना यांच्यामध्ये एकमत होत नसल्याने हा वेतनकरार रखडला होता. मान्यता प्राप्त



संघटनेसोबत वेतनकरारासाठी ३३ बैठका झाल्या होत्या. तर वेतन कराराला तब्बल २३ महिने विलंब झालेला आहे. त्यामुळे परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी ४८४९ कोटींचा वेतन करार ५ जून रोजी जाहीर केला होता. तो मान्य नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी ८ अणि ९ जून रोजी दोन दिवसांचा अघोषित संप केला होता. त्यानंतरही वेतन करारावर कोणताही तोडगा निघाला नव्हता. अखेर आता राज्य सरकारनेच कामगार कराराला मंजुरी दिल्यामुळे हा वेतनकरार लागू करण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. या वेतनवाढीमुळे कर्मचाऱ्यांचा पगार पाच ते १२ हजारांपर्यंत वाढणार आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी तीन वर्षे कनिष्ठ वेतनश्रेणीत काम केले आहे.

# पॅन–आधार कार्ड लिंक करण्यासाठी आता ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली–** आता ३१ मार्च २०१९ पर्यंत पॅन कार्डला आधार कार्ड लिंक करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. ३० जूनपर्यंतची मुदत यापूर्वी देण्यात आली होती. पण शनिवारी करदात्यांना केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) पॅन क्रमांक आणि आधार एकमेकांशी लिंक करण्यासाठी दिलेली मुदत पुढील वर्षाच्या मार्चअखेरपर्यंत वाढवली. आतापर्यंत पॅन-आधार लिंक करण्यासाठी ३१ जुलै २०१७, ३१ ऑगस्ट २०१७, ३१ डिसेंबर २०१७, ३० जून २०१८ व आता ३१ मार्च २०१९ अशी पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. ३३ कोटींपैकी १६ कोटी ६५ लाख पॅन कार्ड गेल्या




मार्चअखेरपर्यंत आधारशी लिंक केल्याची माहिती आहे.

बँक खाते, मोबाइल क्रमांक आदींसाठी आधार लिंक करणे केंद्र सरकारने अनिवार्य केले आहे. तसेच एलपीजी गॅसमधील अनुदान आणि इतर योजनांचा लाभ मिळवण्यासाठी केंद्राने केलेल्या आधार सक्तीचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे. न्यायालयाने विविध सेवांना आधार लिंक करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश दिले होते. सरकारने त्यावेळी अतिरिक्त दोन महिने वाढवत ३० जूनपर्यंतची मुदतवाढ दिली होती. आता पुन्हा पुढील वर्षाच्या ३१ मार्च २०१९पर्यंत ही मुदत वाढवून देण्यात आली आहे.

# 'राज ठाकरेंचा मनसे पक्ष संपलाय'

**मुंबई-** प्लास्टिक बंदीच्या निर्णयाच सर्व स्तरातून लोक स्वागत करत असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यापाऱ्यांकडून सुपारी घेऊन शिवसेनेला बदनाम करण्याच काम सुरू केल आहे. मनसे पक्ष संपलाय असे म्हणत पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी राज ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. मुंबईत घाटकोपर येथे शिवसेनेच्या वतीने कापडी पिशव्यांच्या वाटपाचा कार्यक्रम रामदास कदम यांच्या उपस्थितीत




आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा दरम्यान पत्रकारांनी राज ठाकरे प्लास्टिक बंदीच्या निर्णयाला विरोध करत असल्याकडे लक्ष वेधन्यात आले. त्यावेळी पर्यावरण मंत्री कदम यांनी राज ठाकरे चुकीचे बोलत आहेत, खरतर या निर्णयाच त्यांनी स्वागत करायला हव होत. सबंध जगाने आज प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे. आपल्या देशाला याच यजमानपद मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले. प्लास्टिक बंदीचा निर्णय एका दिवसात घेतलेला नाही. या निर्णयाला आताच विरोध करणारे नऊ महिने झोपले होते का? त्यांचा पक्ष संपला आहे. व्यापाऱ्यांकडून सुपारी घेऊन ते शिवसनेला बदनाम करत आहेत. राज ठाकरे काळ्या मांजरासारखे या निर्णयाच्या आड येत असल्याचे ते म्हणाले. देशात सद्या १७ राज्यांत प्लास्टिक बंदी आहे. जागतिक निर्णय झाल्यावर महाराष्ट्राने त्याची प्रथम सुरुवात केली आहे.

# अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा शाळ श्रीफळ व भेटभस्तू देऊन सत्कार








**(पान १ वरुन)** मान्यवरांना बोलावून त्यांच्या हस्ते साईवाडी परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना वेगवेगळ्या क्षेत्राबद्दल माहिती देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो. सदर प्रसंगी अंधेरी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व त्यांचे सहकारी उपस्थित राहून विविध विषयावर मार्गदर्शन करतात. या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ नागरिकांना खूप समस्यांना सामोरे जावे लागते. या कार्यक्रमाचे आयोजन सिनियर सिटीझन सोशल राईट्सचे उपसचिव संतोष चौधर, अंधेरी कमिटीचे अध्यक्ष तुकाबाई चौधर, सल्लागार अनंत दाभोळकर, पंढरीनाथ खंडागळे, संजय नंदा, उल्हास शिरसोळे, काशीनाथ मांडवकर, रेवाळे, प्रभू व सचिव वासूदेव पाष्टे यांनी केले.

# उमेदवारांसाठी भाजप लाचार

**सांगली-** सांगली महापालिका निवडणुकीत भाजपला उमेदवारांसाठी लाचार व्हावे लागत आहे, अशी जोरदार टीका युवक काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष व आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी पत्रकार परिषदेत केली. मतदान व उमेदवारांसाठी भाजप नेते भेटवस्तूंबरोबर इतर कोणत्याही थराला जातील, अशी बोचरी टीका माजी मंत्री व आमदार सतेज पाटील यांनी यावेळी केली. कदम व पाटील म्हणाले, आजपासून काँग्रेसने इच्छुकांच्या मुलाखती सुरू केल्या आहेत. उमेदवारांचा मोठा प्रतिसाद आहे. सर्व नेते व पदाधिकारी एकजुटीने काम करीत आहोत. त्यामुळे आम्हाला विजयाची खात्री आहे. पक्षात बंडखोरी होऊ देणार नाही. निष्ठावंताना न्याय दिला जाईल. त्यांच्या पाठीशी पक्षाची सर्व ताकद उभी केली जाईल. मुलाखती घेतल्यानंतर ती यादी प्रदेशकडे पाठविली जाईल. तसेच नागपूरमध्ये प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे.

# लॉटरी रोजगार बचाव महाकृती समितीचा संपूर्ण राज्यभर काळा दिवस साजरा




**(पान १ वरून)** यावेळी लॉटरी विक्रेत्याचे तारणहार या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या कृपेने सुरू असलेल्या लॉटरी विक्रेत्यांना आठवण आल्याशिवाय राहणार नाही. सरकारला वेळोवेळी निवेदन देऊनही काही मार्ग निघत नाही असे उद्‌गार लॉटरी रोजगार बचाव महाकृती समितीच्या अनेक मान्यवरांनी काढले. यावेळी लॉटरी व विक्रेत्यांच्या न्याय हक्कासाठी विविध पक्षाचे युनियन अध्यक्ष उपस्थित होते. या प्रसंगी रमाकांत आचरेकर, चंद्रकांत मोरे, बंटीभाई म्हशीलकर, श्रीनिवास तावडे, सुरेश भगत, रविंद्र सातर्डेकर, मनोज वारंग, स्नेहल शहा व अनेक पदाधिकारी व लॉटरी विक्रेते हजर होते.

# 'दूध आणि मर्सिडीजवर सारखाच कर लावायचा का?'

**नवी दिल्ली-** 'सर्व वस्तूंवर एकच स्लॅब ठेवावा हे सांगणं सोपं आहे, पण मग आम्ही कोणत्याही एका वस्तू किंवा खाद्यपदार्थावर शून्य टक्के जीएसटी लावू शकणार नाही. दूध आणि मर्सिडीज गाडी सारखाच कर लावता येईल का?,' असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. वस्तू आणि सेवा कर अर्थात



जीएसटीच्या वर्षपूर्तीनिमित्त स्वराज्य पत्रिकेला दिलेल्या मुलाखतीत मोदी असं म्हणाले. काँग्रेसवर हल्लाबोल करताना मोदी म्हणाले, 'काँग्रेस पक्षातले आमचे मित्र म्हणतात की जीएसटीचा दर एकच असायला हवा. असं असलं तर आम्ही खाद्यपदार्थ आणि जीवनावश्यक वस्तूंवरही कर लावायचा का? या वस्तूंवर सध्या शून्य, पाच किंवा १८ टक्के कर लावला जातो.'

जीएसटीसंदर्भात विचारलेल्या अन्य प्रश्नांची उत्तरे देताना मोदी म्हणाले, 'स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत ६६ लाख इंटरप्रायझेसची नोंदणी झाली आहे. पण जीएसटी लागू झाल्यानंतर एका वर्षाच्या आतच ४८ लाख नव्या नोंदणी झाल्या आहेत. ३५० कोटी पावत्यांवर प्रक्रीया झाली तर ११ कोटी कर परतावे भरले गेले. जीएसटी किचकट आहे, असा आरोप करण्यापूर्वी या वस्तुस्थितीकडेही आपण पाहायला हवे.' केंद्र सरकारने आतापर्यंत ४०० वेगवेगळ्या वस्तूंवर करकपात केली आहे. सुमारे १५० वस्तूंवरचा कर रद्द करण्यात आला आहे, अशी माहितीही मोदी यांनी यावेळी दिली.

# इंग्लंड दौऱ्याआधी भारताला धक्का, बुमराह टी-ट्वेण्टी मालिकेतून बाहेर

**मुंबई-** इंग्लंडविरुद्‌घ होणाऱ्या आगामी टी-ट्वेण्टी मालिकेआधी भारतीय संघाला धक्का बसला आहे. भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे टी-ट्वेण्टी मालिकेतून बाहेर झाला आहे. बुमराहसोबतच फिरकीपटू वॉशिंगटन सुंदरही दुखापतीमुळे या टी-ट्वेण्टी मालिकेला मुकणार आहे. वॉशिंगटन सुंदर आयर्लंडविरुद्धच्या सामन्याआधी झालेल्या सरावादरम्यान फुटबॉल खेळताना जमखी झाला




होता. तर आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-ट्वेण्टी सामन्यात क्षेत्ररक्षण करताना बुमराहला दुखापत झाली होती. बुमराह संघाबाहेर जाणे भारतीय संघासाठी मोठा झटका आहे. कारण अखेरच्या षटकांत अचूक गोलंदाजी करत समोरच्या संघाला अडचणीत आणण्यासाठी जसप्रीत बुमराह ओळखला जातो. दरम्यान, बुमराह टी-ट्वेण्टी मालिकेला मुकणार असला तरीही तो इंग्लडविरुद्धच्या वनडे मालिकेपर्यंत फीट होणार असल्याचं समजतंय.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)